## 22. कनिष्ठ न्यायालय भाग VI - कलम 233 ते 237

- **कलम 233 -** जिल्हा न्यायाधिशांची नियुक्ती. राज्यपाल उच्च न्यायालयाचा विचार घेवून आवश्यक पात्रता असणाऱ्या पुढील व्यक्तीस जिल्हा न्यायाधीश म्हणुन नियुक्ती करतात. 1) सात वर्षे वकिली केलेला असावा, 2) उच्च न्यायालयाने नियुक्तीची शिफारस केलेली असावी.
- **कलम 234 -** जिल्हा न्यायाधीशांव्यतिरिक्त अन्य न्यायाधीशांची नियुक्ती. संबंधीत राज्याचे राज्यपाल लोकसेवा आयोग व उच्च न्यायालयाचा विचार घेवून न्यायीक सेवेत इतर अधिकाऱ्यांची भरती करतील.
- **कलम 235 -** दुय्यम न्यायालयावर नियंत्रण. जिल्हा न्यायालय, त्याखालील न्यायालय यांच्या बढती, बदली, रजामंजुरी चा अधिकार उच्च न्यायालयास असतो.
- **कलम 236 -** जिल्हा न्यायाधीश व न्यायीक सेवा या शब्दाचा अर्थ स्पष्ट करणे.
- **कलम 237 -** राज्यपाल अधिसुचनेद्वारे राज्यातील न्यायीक सेवेतील व्यक्तींना काही नियम किंवा कायदे लागू करतील.

**जिल्हा व सत्र न्यायालय -**

- महाराष्ट्रात सध्या 36 पैकी 29 जिल्ह्यात आहेत.
- प्रारंभिक अधिकार, अपिलाचे अधिकार, दिवाणी व फौजदारी खटले चालविण्याचा अधिकार.

# भारतीय राज्यव्यवस्था नोट्स

**लोकन्यायालय / लोक अदालत -**

- गावातील अनुभवी ज्येष्ठांकडून तक्रार निवारण्याच्या भारतातील पारंपारिक व्यवस्थेचे सुधारित व गांधीवादी तत्त्वावर आधारित असणारी व्यवस्था म्हणजे लोकन्यायालय.
- लोकन्यायालय अधिनियम 1987 नुसार स्थापना.
- लोकन्यायालयास फक्त दिवाणी न्यायालयाचे अधिकार आहेत.
- कोणतेही शुल्क ताठर स्वरुपाची कार्यपद्धती अवलंबली जात नाही.
- नियमित खटल्यापेक्षा अधिक जलद गतीने कमी खर्चात खटल्याची सोडवणूक होते.
- न्यायालयावरील कामाचे ओझे कमी होते.

**कौटुंबिक न्यायालय -**

- **जनक** - श्रीमती दुर्गाबाई देशमुख.
- कौटुंबिक न्यायालय कायदा 1984 नुसार भारतात कुटुंब न्यायालयाची स्थापना.
- महाराष्ट्रातील पहिले कुटुंब न्यायालय - पुणे, 1988 तर दुसरे मुंबई, 1989.
- 10 लाख पेक्षा जास्त लोकसंख्येच्या शहरासाठी हे न्यायालय स्थापन होते.
- भारतात सर्वाधिक कौटुंबिक न्यायालय उत्तरप्रदेश - 76 तर महाराष्ट्रात - 22 आहेत.
- कुटुंब न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध अपील उच्च न्यायालयात करता येते.

**ग्राम न्यायालय -**

- **स्थापना -** ग्राम न्यायालय कायदा 2008.
- **उद्देश -** तळागाळातील लोकांना न्यायाप्रती जाणीव व्हावी आणि न्याय मिळावा.
- **ठिकाण -** पंचायत समिती.
- **पुढील ठिकाणी ग्रामन्यायालय नाही -** जम्मू-काश्मीर, नागालँड, अरुणाचल प्रदेश, सिक्कीम.
- राज्यशासन उच्च न्यायालयाचा विचार घेवून ग्राम न्यायालयाची स्थापना व ठिकाण निश्चित करते.

**लघुवाद न्यायालय -**

- **स्थापना -** 1753 (कोर्ट ऑफ रिकेस्ट)
- **ठिकाण -** मुंबई, कलकत्ता, मद्रास
- **1882** - कोर्ट ऑफ रिक्वेस्ट चे रुपांतर लघुवाद न्यायालयात.
- **महाराष्ट्रातील ठिकाण -** मुंबई, पुणे, नागपूर
- लघुवाद न्यायालय दिवाणी स्वरुपाच्या खटल्याचा निकाल देतात.